निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
२२ डिसेंबर २०२५
पाने: ०४ । किंमत: २ .००
वर्ष: १५ वे । अंक: २८९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## महायुतीचा झंझावात: महाराष्ट्रातील २८८ नगरपालिका आणि नगरपंचायतींवर 'भगवा' आणि 'घड्याळा'चे वर्चस्व

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रणधुमाळीचा निकाल अखेर जाहीर झाला असून, राज्याच्या राजकीय नकाशावरमहायुतीने (भाजप, शिवसेना-शिंदे गट, आणि राष्ट्रवादी-अजित पवार गट) आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. राज्यातील २८८ नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी झालेल्या या निवडणुकीत महायुतीने विक्रमी जागा जिंकत महाविकास आघाडीला (मविआ) मोठा धक्का दिला आहे.



**निकालाचे मुख्य कल: भाजपची ऐतिहासिक कामगिरी**

२१ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या मतमोजणीत सुरुवातीपासूनच महायुतीने आघाडी घेतली होती. एकूण २८८ संस्थांपैकी महायुतीने२१० पेक्षा जास्त ठिकाणी आपले नगराध्यक्ष बसवण्यात यश मिळवले आहे. यामध्ये भारतीय जनता पक्षाने (इगझ) स्वबळावर १०० हून अधिक जागा जिंकून राज्याचा 'मोठा भाऊ' असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

**पक्षनिहाय बलाबल (अंदाजे):**

भाजप: १२५+ नगराध्यक्ष
शिवसेना (शिंदे गट): ५५ नगराध्यक्ष
राष्ट्रवादी (अजित पवार): ४० नगराध्यक्ष
काँग्रेस: २५ नगराध्यक्ष
शिवसेना (ठाकरे गट): १० नगराध्यक्ष
राष्ट्रवादी (शरद पवार): ०८ नगराध्यक्ष
इतर व अपक्ष: २५ नगराध्यक्ष

**विभागीय विश्लेषण: कुठे कोण भारी?**

**१.विदर्भ आणि मराठवाडा:** भाजपचा बालेकिल्ला असलेल्या विदर्भात काँग्रेसला काही जागांवर यश मिळाले असले, तरी नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली पट्ट्यात भाजपने मोठी मुसंडी मारली आहे. मराठवाड्यात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपची युती प्रभावी ठरली.

**२.पश्चिम महाराष्ट्र:** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वर्चस्वामुळे पश्चिम महाराष्ट्रात महायुतीने मुसंडी मारली. विशेषतः पुणे आणि सातारा जिल्ह्यातील अनेक नगरपालिकांमध्ये अजित पवारांच्या नेतृत्वाला मतदारांनी पसंती दिली आहे.

**३.कोकण आणि उत्तर महाराष्ट्र:** कोकणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने आपले गड राखले आहेत, तर उत्तर महाराष्ट्रात गिरीश महाजन आणि दादा भुसे यांच्या रणनीतीमुळे महायुतीला मोठे यश मिळाले.

**निकालाचे राजकीय महत्त्व**

या निवडणुका केवळ स्थानिक प्रश्नांवर आधारित नव्हत्या, तर त्या आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठीची 'लिटमस टेस्ट' मानल्या जात होत्या.

विकासाच्या मुद्द्याला पसंती: केंद्रातील आणि राज्यातील डबल इंजिन सरकारने राबवलेल्या लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान योजना आणि पायाभूत सुविधांच्या कामांना जनतेने कौल दिला असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

विरोधकांचे आत्मचिंतन: महाविकास आघाडीला (काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार गट) या निवडणुकीत अपेक्षित यश मिळालेले नाही. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागात मविआला आपल्या रणनीतीमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**नगराध्यक्षांची निवड आणि घराणेशाही**

यावेळच्या निवडणुकीत एक विशेष कल दिसून आला, तो म्हणजे'घराणेशाही'. निवडून आलेल्या २८८ नगराध्यक्षांपैकी सुमारे ७५ ते ८० नगराध्यक्ष हे प्रस्थापित राजकीय नेत्यांचे नातेवाईक किंवा वारसदार आहेत. तरुण रक्ताला संधी मिळाली असली, तरी राजकीय वारसा असलेल्या उमेदवारांना मतदारांनी अधिक पसंती दिल्याचे दिसते.

**मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया**

विजयानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हा विजय सर्वसामान्य जनतेचा आणि विकासाचा आहे. लोकांनी कामाला मत दिले आहे. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांच्या मेहनतीला दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही ग्रामीण महाराष्ट्राने महायुतीवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले.

**पुढील पाऊल :** नगरपालिकांच्या या निकालानंतर आता राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापणार आहे, कारण पुढच्या महिन्यात मुंबई, पुणे आणि ठाणे यांसारख्या मोठ्यामहानगरपालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या विजयामुळे महायुतीचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असून विरोधकांना नव्याने मोर्चेबांधणी करावी लागणार आहे.

## संक्षिप्त

### उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी/** शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला. तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी आपण विद्यार्थी घडवू शकू.

फक्त अभ्यासक्रमांनी शिक्षण संस्था मोठी होत नाही, तर ती मोठी होते ती तिच्या विद्यार्थ्यांमुळे, असे पद्मश्री डॉ. यादव यावेळी म्हणाले. दृढ संकल्प असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते, असे सत्यनारायण नूवाल यांनी सांगितले.

रावबहादूर डी. लक्ष्मी नारायण यांना लक्ष्मीनारायण गीताद्वारे अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक एलआयटी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माधव लाभे यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत माधव लाभे यांनी केले. सत्यनारायण नूवाल यांचे स्वागत कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी, तर पद्मश्री डॉ. यादव यांचे स्वागत मोहन पांडे यांनी केले. संघटनेच्या स्मरणिकेचे प्रकाशन अतिथींच्या हस्ते झाले. राकेश गुप्ता, उत्कर्ष खोपकर, मोहन पांडे यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन सचिन पळसोडकर आणि मिली जुनेजा यांनी केले. आभार डॉ. वैद्य यांनी मानले.

## मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने घेतला महत्त्वपूर्ण निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर राज्य सरकारने काल, २१ डिसेंबर रोजी तातडीची विशेष बैठक घेतली. या बैठकीत 'सगेसोयरे' अध्यादेशाची अंमलबजावणी आणि प्रलंबित कुणबी नोंदींबाबत अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

**प्रक्रिया वेगवान करणार:** कुणबी नोंदी शोधण्यासाठी स्थापन केलेल्या 'शिंदे समिती'चा कार्यकाळ वाढवून कायदेशीर प्रक्रिया युद्धपातळी-वर पूर्ण करण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे.

**सगेसोयरे अध्यादेश:** रक्तातील नातेवाइकांना (सगेसोयरे) कुणबी प्रमाणपत्रे देण्याबाबतच्या हरकतींवर तातडीने निर्णय घेऊन कायदेशीर पेच सोडवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.


**आंदोलकांचे लक्ष:** सरकारच्या या सकारात्मक भूमिकेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी सावध पवित्रा घेतला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे संपूर्ण मराठा समाजाचे लक्ष लागले आहे. या निर्णयामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेला आरक्षणाचा प्रश्न सुटण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले असल्याचे मानले जात आहे.

## 'मुख्यमंत्री पद ज्यांचं आहे, त्यांचंही येणार-जाणार'; सुधीर मुनगंटीवारांचं पुन्हा परखड मत

**आत्ताच एक्सप्रेस**

**चंद्रपूर / प्रतिनिधी/** भाजपला राज्यात मोठा विजय मिळाला असला तरी भाजप नेते सुधीर मुनगंटीवारांचा (डींवहळी ींपसरपींळुरी) बालेकिल्ला समजला जाणाऱ्या चंद्रपुरात ११ पैकी आठ ठिकाणी काँग्रेसचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. तर भाजपला (इगझ) अवघ्या दोन जागा मिळाल्या आहेत. या पराभवानंतर पक्षाचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी थेट पक्षाच्या नेतृत्वावर टीका केली. काँग्रेसने त्यांच्या नेत्यांना शक्ती दिली, तर आमच्या पक्षाने माझी शक्ती कमी केली असं वक्तव्य मुनगंटीवारांनी केलं होतं. त्यामुळे, सुधीर मुनगंटीवारांची मनातील खदखद बाहेर पडली अशी चर्चा सुरू आहे. त्यावर, भाजप नेत्यांनीही प्रतिक्रिया दिल्या आहेत. आता, पुन्हा एकदा सुधीर मुनगंटीवारांनी आपलं परखड मत मांडलं आहे. मुख्यमंत्रीपद हे परमंट नाही, तेही येणार आणि जाणार असं त्यांनी म्हटलं.

विदर्भातील १०० नगरपरिषद आणि नगरपंचायतींपैकी तब्बल ५५ ठिकाणी भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या नागपुरात २७ पैकी २२ नगरपालिकेवर भाजपनं झेंडा



फडकवला आहे. मात्र, चंद्रपूरमध्ये भाजपला केवळ दोनच ठिकाणी विजय मिळवता आला आहे. त्यानंतर मुनगंटीवारांनी त्यांच्या मनातील खदखद व्यक्त केली होती. त्यावर, भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली होती. चंद्रपुरात जे घडलं त्याची नक्कीच आम्हाला आत्मचिंतनाची गरज आहे. मात्र सुधीर मुनगंटीवार चंद्रपूरमधील पराभवाचा संबंध मंत्रीपदाशी जोडत असले, आणि त्यांची भावना योग्य असली, तरी मंत्रिपद नसणे आणि पराभव होणे असा थेट संबंध नाही. चंद्रपूरबद्दल नक्कीच आत्मविश्लेषण करू, वेळ आली तर सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबतही बोलू, असे बावनकुळेंनी म्हटलं होतं. आता, त्यावर पुन्हा एकदा मुनगंटीवारांनी आपलं मत मांडलं आहे.

मी नाराज नाही पण योग्यवेळी योग्य सल्ला देण्याची जबाबदारी पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून माझी आहे. कार्यकर्त्यांचा आवाज होण्याची जबाबदारी निश्चित माझी आहे आणि मी ती व्यवस्थितपणे वठवतो. पक्षाने मला जेव्हा जेव्हा शक्ती दिली तेव्हा मी कामाच्या माध्यमातून पक्षाची प्रतिष्ठा वाढावी यासाठी काम केलं. मंत्रिपद मिळालं नाही म्हणून मी नाराज कशाला असेल, नाराजी जनतेत असेल. मंत्रिपद येतं आणि जातं, मुख्यमंत्री पद ज्यांचं आहे त्यांचंही येणार आहे जाणार आहे, परमनंट कोणीच नाही, अशा शब्दात सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा आपलं परखड मत मांडलं. तसेच, उत्तमोत्तम काम करायचं हेच फक्त आमचं काम आहे, असेही त्यांनी म्हटले.

**शोभाताईंची भेट कौटुंबिक :** शोभाताई काही आता भाजपच्या पदाधिकारी नाहीत, त्यांच्याकडे कुठली जबाबदारी नव्हती, त्यांनी कुठली सभा घेतली नाही. त्यामुळे निवडणुकीच्या संदर्भात त्या गेल्या असतील असं मला वाटत नाही. त्या मुख्यमंत्र्यांच्या काकू आहेत, कुटुंबाचे प्रश्न म्हणून गेल्या असतील. कार्यकर्त्यांचा आग्रह आहे की मी त्यांना भेटावं, त्यांचं मत जाणून घ्यावं, त्यामुळे भाजपचा एक कार्यकर्ता म्हणून ही माझी जबाबदारी आहे. आम्हीही या पक्षाच्या विस्तारात आपलं आयुष्य दिलं आहे.

## कर्ज घेतलं? EMI, व्याज काहीच कमी होणार नाही, बँकेच्या अहवालात सगळंच स्पष्ट सांगितलं

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** देशातील असंख्य बँक आणि पतसंस्था खातेधारकांवर आणि नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारी धोरणं आरबीआयकडून सातत्यानं राबवण्यात येतात. त्याच बँकेच्या पतधोरण बैठकीतील निर्णयांचासुद्धा नागरिकांच्या आर्थिक गणितावर कमीजास्त प्रमाणात परिणाम होत असतो. अशा या आरबीआयनं साधारण दोन आठवड्यांपूर्वीच रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची कपात केली होती. ज्यामुळं हा दर ५.२५ टक्क्यांवर आला होता. ही घट पाहता कर्जाचा हफ्ता कमी होणार असंही अनेकांना वाटलं. पण, वास्तव मात्र काहीसं वेगळं आहे आणि ते स्वीकारण्यावाचून काही पर्याय नाही.



**व्याजदरा बाबतच्या अपेक्षांवर पाणी सोडावं लागणार? :** आरबीआयकडून पतधोरण जारी केलं जात असताना रेपो रेटमध्ये कपात करण्यात आल्यानंतर व्याजदरातही कपात होणार अशीच अनेकांची अपेक्षा होती. मात्र आता या व्याजदरात दीर्घकाळासाठी कोणताही बदल होणार नसल्याचं स्पष्ट होत आहे. खउखउख बँकेच्या एका संशोधनपर अहवालातून ही बाब सूचित करम्यात आली असून, आता पुढं रेपो रेटमध्ये तेव्हाच कपात करण्यात येईल जेव्हा महागाईच्या आकड्यांमध्ये सातत्यपूर्ण घट आढळून येईल. सध्या देशाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल सकारात्मक दिशेनं होत असली तरीही महागाईमध्ये होणारी वाढ पाहता आर्थिक संस्था सावधगिरी बाळगताना दिसत आहेत.

**इथून पुढं व्याजर स्थिरच राहणार? :** खउखउख बँकेच्या आर्थिक संशोधन पथकानं जारी केलेल्या अहवालानुसार एमपीसी आता एक्सटेंडेड पॉजवर असेल. डिसेंबर महिन्या २५ बेसिस पॉईंटच्या कपातीनंतर यामध्ये कोणतीही घाई करण्यात येणार नसून, आता हे दर तेव्हाच कमी होतील जेव्हा महागाई सातत्यानं सद्स्थितीहून कमी असेल. अहवालातील माहितीनुसार बँकेच्या मते आता चझउ दीर्घकाळासाठी स्थिर ठेवण्यात येईल. ज्यामुळं व्याजदरात आता तेव्हात वाढीव कपात केली जाईल, जेव्हा महागाई दराचा आलेख सातत्यानं खआली येताना दिसेल.

## २९ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर, उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा किती?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुंबई-ठाण्यासह राज्यातील प्रलंबित २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली असून, १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आजपासून राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणुकांमध्ये राज्यभरातील ३ कोटी ४८ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, शहरी राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

**अनेक वर्षांपासून प्रलंबित निवडणुकांना अखेर मुहूर्त**

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका गेल्या ५ ते ७ वर्षांपासून, काही ठिकाणी त्याहून अधिक काळ प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला. या पार्श्वभूमीवर, २ डिसेंबर रोजी नगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका पार पडल्यानंतर, आता राज्यातील उर्वरित २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

**महापालिका निवडणुकीचे संपूर्ण वेळापत्रक**

नामनिर्देशन पत्र दाखल : २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर
अर्जांची छाननी : ३१ डिसेंबर
उमेदवारी माघार : २ जानेवारी
चिन्ह वाटप व अंतिम यादी : ३ जानेवारी
मतदान : १५ जानेवारी
निकाल : १६ जानेवारी

राज्यातील २७ महापालिकांची मुदत संपली असून, यासोबतच जालना आणि इचलकरंजी या दोन नव्या महापालिकांच्याही निवडणुका होणार आहेत.

**१ जुलैची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार**

या निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाल्याने, त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नसतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**निवडणुकीशी संबंधित आकडेवारी**

एकूण मतदार : ३.४८ कोटी
एकूण मतदान केंद्रे : ३९,१४७
मुंबईतील मतदान केंद्रे : १०,१११
कंट्रोल युनिट : ११,३४९
बॅलेट युनिट : २२,०००

**उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा किती?**

महापालिका निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. महापालिकेच्या वर्गवारीनुसार ही मर्यादा पुढीलप्रमाणे आहे:

अ वर्ग महापालिका : १५ लाख रुपये
ब वर्ग महापालिका : १३ लाख रुपये
क वर्ग महापालिका : ११ लाख रुपये
ड वर्ग महापालिका : ९ लाख रुपये

खर्च मर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांवर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही आयोगाने दिला आहे.

**मतदान पद्धत आणि उमेदवारी संदर्भातील नियम**

- मुंबई महापालिकेत एक सदस्यीय वॉर्ड प्रणाली असल्याने मतदाराला एकच मत द्यावे लागणार आहे.
- उर्वरित २८ महापालिकांमध्ये एक ते पाच सदस्यीय वॉर्ड असल्याने त्यानुसार मतदान करावे लागणार आहे.
- उमेदवारी अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत.
- ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही, त्यांनी निवडणुकीनंतर सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

**मतदार जनजागृती व सुविधा**

मतदार जनजागृतीसाठी रील्स आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर रॅम्प, व्हील-चेअर आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**सुरक्षा व प्रशासनाची तयारी**

या निवडणुकीसाठी १ लाख ९६ हजार ६०५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानाच्या ४८ तास आधी प्रचार व जाहिरातींवर बंदी राहणार असून, महापालिका निवडणूक नियमांनुसार ही आचारसंहिता कडकपणे अंमलात आणली जाणार आहे.

**२९ महापालिकांमध्ये २,८६९ जागांसाठी मतदान**

राज्यातील २९ महापालिकांमध्ये एकूण २,८६९ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यामध्ये

- १,४४२ महिला सदस्य,
- ७५९ इतर मागासवर्गीय (जइउ),
- ३४१ अनुसूचित जाती,
- ७७ अनुसूचित जमाती यांचा समावेश आहे.

**कोणत्या महापालिकांमध्ये निवडणूक होणार?**

१. बृहन्मुंबई - २२७
२. भिवंडी-निजामपूर - ९०
३. नागपूर - १५१
४. पुणे - १६२
५. ठाणे - १३१
६. अहमदनगर - ६८
७. नाशिक - १२२
८. पिंपरी-चिंचवड - १२८
९. औरंगाबाद - ११३
१०. वसई-विरार - ११५
११. कल्याण-डोंबिवली - १२२
१२. नवी मुंबई - १११
१३. अकोला - ८०
१४. अमरावती - ८७
१५. लातूर - ७०
१६. नांदेड-वाघाळा - ८१
१७. मीरा-भाईंदर - ९६
१८. उल्हासनगर - ७८
१९. चंद्रपूर - ६६
२०. धुळे - ७४
२१. जळगाव - ७५
२२. मालेगाव - ८४
२३. कोल्हापूर - ९२
२४. सांगली-मिरज-कुपवाड - ७८
२५. सोलापूर - ११३
२६. इचलकरंजी - ७६
२७. जालना - ६५
२८. पनवेल - ७८
२९. परभणी - ६५

# टी २० विश्वचषकासाठी संतुलित संघ निवड

७ फेब्रुवारी ते २८ मार्च या कालावधीत आपल्याच देशात टी २० सामन्यांची विश्वचषक स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी २० तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. श्रीलंका हा या विश्वचषकाचा सहयजमान असून पाकिस्तान संघाचे सर्व सामने श्रीलंकेत होणार आहेत. या विश्व चषक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सूर्यकुमार यादव हा करेल तर अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल हा या संघाचा उपकर्णधार आहे. शुभमन गिल हा भारताचा सलामीवर या स्पर्धेत भारतीय संघाचा सदस्य नसेल कारण गेल्या काही टी २० सामन्यात त्याची फलंदाजी ढेपाळली असल्याने त्याला निवड समितीने संघातून वगळले आहे. त्यामुळे या भारतीय संघाच्या डावाची सुरुवात यष्टिरक्षक संजू सॅमसन व युवा अभिषेक शर्मा हे करतील. संजू अनुभवी तर अभिषेक युवा खेळाडू आहे. संजू आणि अभिषेक हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची धडाकेबाज सुरवात करतील यात शंका नाही. संजू हा आश्वासक फलंदाज असून अभिषेक हा धडाकेबाज फलंदाज आहे. सध्या टी २० प्रकारात तो जगातील सर्वात घातक फलंदाज असून आपल्या धडाकेबाज फलंदाजीने तो प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवतो. संजू आणि अभिषेक यापिकी एक जरी फलंदाज किमान १० षटके टिकला तरी भारताचा विजय पक्का होतो. संजू आणि अभिषेक यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून ईशान किशन याची निवड करण्यात आलेली आहे. ईशान किशन हा संजू सॅमसनचा बॅकअप यष्टिरक्षही आहे. तिलक वर्मा हा तिसऱ्या क्रमांकावर खेळेल. तिलक वर्मा हा सध्या भारतीय संघातील सर्वात भरवशाचा खेळाडू असून फॉर्मात आहे. त्याने सातत्यपूर्ण खेळ करून भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. मधल्या फळीची जबाबदारी कर्णधार सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि रिंकू सिंग यांच्यावर आहे. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. टी २० सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही टी २० सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. स्थानिक क्रिकेट असो की आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट या तिघांची कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली आहे त्यामुळे त्यांच्या निवडीवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. त्यांची निवड भारतासाठी सुचिन्ह आहे. त्यांनी जर चांगली सुरुवात केली तर भारताचे निम्मे काम फत्ते होईल. टी २० सामन्यात धडाकेबाज सुरुवात होणे महत्वाची आहे आणि हे तिघेही धडाकेबाज खेळीसाठी प्रसिद्ध आहे. चौथ्या क्रमांकावर भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव येईल तो भारताचा भरवशाचा फलंदाज असून मैदानातील सर्व दिशेला चेंडू मारण्याची त्याची खासियत आहे. सध्या त्याची बॅट रुसली असली तरी कोणत्याही क्षणी तो फॉर्मात येऊ शकतो. रिंकू सिंग हा आणखी एका धडाकेबाज फलंदाजाला निवड समितीने संधी दिली असून मिळालेल्या संधीचे तो ही सोने करेल यात शंका नाही. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शिवम दुबे हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी अक्षर पटेल सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळाली आहे. कुलदीप आणि अक्षर दोघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत मात्र त्यांच्यात विविधता आहे. अक्षर पटेल अर्थोडॉक्स स्पिनर आहे तर कुलदीप चायनमन गोलंदाज आहे त्यामुळे जरी ते डावखुरे असले तरी त्यांच्यात विविधता आहे. आणि दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहे अक्षर पटेल हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. वॉशिंग्टन सुंदर या आणखी एका अष्टपैलू खेळाडूची निवड समितीने निवड केली आहे तो ऑफस्पिन गोलंदाजी आणि फलंदाजीही करतो. वरुण चक्रवर्ती हा मिस्ट्री गोलंदाज भारतीय संघात आहे. त्याची लेगस्पिन भल्या भल्या फलंदाजाला बुचकळ्यात टाकते. तो जबरदस्त फॉर्मात आहे. भारताला चॅम्पियन ट्रॉफी आणि आशिया चषक जिंकून देण्यात त्याचे मोलाचे योगदान होते.

आताही त्याने तसेच योगदान दिले तर भारत टी २० विश्वचषकावर पुन्हा एकदा नाव कोरू शकतो. जसप्रीत बुमराह व अर्शदीप सिंग या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत हर्षित राणा या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने अर्शदीप सिंग या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर दोन वर्षापूर्वी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. शुभमन गिल, श्रेयस अय्यर यशस्वी जयस्वाल, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज या अनुभवी खेळाडूंची निवड न झाल्याचे दुःखही आहे मात्र निवड समिती फक्त पंधरा सदस्यांचा संघ निवडू शकते त्यामुळे इच्छा असूनही निवड समितीला या खेळाडूंना या संघात निवडता आले नसेल मात्र भविष्यात त्यांना नक्की संधी मिळेल त्यामुळे त्यांनी नाउमेद होऊ नये. टी २० विश्वचषकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. या १५ खेळाडूंनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून टी २० विश्वचषकावर पुन्हा भारताचे कोरावे. टी २० विश्वचषकावर भारताचे नाव कोरण्यासाठी हे खेळाडू जीवाचे रान करतील आणि १४५ कोटी भारतीयांना टी २० विश्वचषक जिंकून देतील यात शंका नाही. तसे झाले तर इतिहास घडेल कारण भारताने याआधी दोनदा टी २० विश्वचषकावर नाव कोरले आहे आता जर भारताने पुन्हा हा विश्वचषक जिंकला तर तीनदा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल.

यासह सलग दुसऱ्यांदा आणि टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला यजमान देश ठरण्याचा बहुमानही भारताला मिळेल. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. टी २० सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा भारतात होणार आहे. घरच्या खेळपट्टीवर खेळण्याचा फायदा भारतीय संघाला नक्की मिळेल यात शंका नाही त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला पुन्हा एकदा टी २० विश्वचषक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!

# गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य..

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य केवळ धार्मिक चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रवाहाला दिशा देणारे ठरते. अशाच महान विभूतींपैकी एक म्हणजे गुरु गोविंद सिंह होय. शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांचे कार्य हे केवळ धर्मगुरुपदापुरते सीमित नव्हते. ते एक समाजसुधारक, न्यायासाठी लढणारे योद्धा, मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञ आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देणारे नेतृत्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याचा वेध घेणे म्हणजे भारतीय समाजातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संघर्षाचा इतिहास समजून घेणे होय.

गुरु गोविंद सिंह यांचा काळ हा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अस्थैर्याचा होता. समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धार्मिक असहिष्णुता आणि सत्ताधारी वर्गाच्या अन्यायाने ग्रासलेला होता. सामान्य माणूस भयभीत जीवन जगत होता. धर्माचा वापर माणसामाणसांतील भेद वाढवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत गुरु गोविंद सिंह यांनी धर्माला सामाजिक न्यायाचे साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेली कृती होती.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे खालसा पंथची स्थापना. ही घटना केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. खालसा पंथाने जात, वर्ण, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि सामाजिक भेदभाव यांना ठामपणे नाकारले. खालसा पंथात प्रवेश करताना सर्वांना समान ओळख देण्यात आली. सिंह आणि कौर ही नावे स्वीकारून स्त्री-पुरुषांना समान दर्जा देण्यात आला. या कृतीतून गुरु गोविंद सिंह यांनी स्पष्ट संदेश दिला की, मानवाची ओळख त्याच्या जन्मावर नाही, तर त्याच्या मूल्यांवर आणि कर्तृत्वावर आधारित असावी.

स्त्री-पुरुष समानतेचा विचार गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्या काळात स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक अमानवी प्रथा आणि रूढी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालत होत्या. गुरु गोविंद सिंह यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. खालसा पंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सन्मान, अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या. स्त्री ही दुर्बल नसून समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहे, असा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. त्यामुळेच शीख परंपरेत स्त्रीला आत्मसन्मानाचे स्थान मिळाले.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक विचारात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी आपल्या अनुयायांना गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा संदेश दिला. अन्याय सहन करणे हा धर्म नाही, तर अन्यायाला विरोध करणे हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. याच विचारातून संत-सिपाही ही संकल्पना पुढे आली. मनाने संत असावे, परंतु अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि शक्ती अंगी असावी, असा त्यांचा आग्रह होता. ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान देणारी ठरली.

धार्मिक सहिष्णुता आणि मानवता हा गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा आत्मा होता. त्यांनी कोणत्याही एका धर्माला श्रेष्ठ मानले नाही, तर सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. त्यांच्या लिखाणातून आणि उपदेशातून मानवतेचे सर्वोच्च मूल्य सतत अधोरेखित होते. देवपूजेपेक्षा मानवसेवा श्रेष्ठ आहे, हा विचार त्यांनी समाजात दृढ केला. त्यामुळे शीख धर्म हा केवळ धार्मिक पंथ न राहता मानवी मूल्यांवर आधारित सामाजिक चळवळ बनला.

गुरु गोविंद सिंह यांनी शिक्षण आणि विवेकशीलतेलाही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. अंधश्रद्धा, रूढीवादी परंपरा आणि अज्ञान यांना त्यांनी समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना ज्ञानसंपन्न, विचारशील आणि प्रश्न विचारणारे बनवण्यावर भर दिला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांमुळे समाजात विवेकवादी दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

त्यांच्या सामाजिक कार्यात सेवा आणि त्यागाला अनन्यसाधारण स्थान होते. गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण जीवनच त्यागाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे, पुत्रांचे बलिदान दिले, तरीही अन्यायापुढे झुकण्यास नकार दिला. हे बलिदान केवळ धार्मिक नव्हते, तर ते मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानासाठी होते. त्यांच्या या त्यागातून समाजाला धैर्य, निष्ठा आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा आदर्श मिळतो. आजही त्यांचे जीवन सांगते की, सत्य आणि न्यायासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही.

गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य हे कालातीत आहे. आजच्या आधुनिक समाजातही जातीय भेदभाव, धार्मिक असहिष्णुता, स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक अन्याय आणि शोषण विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा वेळी गुरु गोविंद सिंह यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतो.

वर्तमानपत्रात त्यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध होणारा लेख हा केवळ इतिहासाची उजळणी नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देणारा असतो. गुरु गोविंद सिंह यांनी दिलेला सामाजिक संदेश आपल्याला सांगतो की, धर्म हा माणसामाणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नसून, त्या भिंती पाडण्यासाठी असावा. शक्ती ही दडपशाहीसाठी नव्हे, तर संरक्षणासाठी आणि न्यायासाठी वापरली जावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक मानव हा सन्मानास पात्र आहे.

२२ डिसेंबर रोजी आपण गुरु गोविंद सिंह यांची जयंती साजरी करताना आपण केवळ धार्मिक विधी आणि समारंभांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेची कास धरणे, हाच त्यांच्या विचारांना खरे अभिवादन ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जर आपण न्याय, समता आणि बंधुतेसाठी सतत कार्यरत राहिलो, तरच गुरु गोविंद सिंह यांच्या विचारांचे खरे स्मरण आणि त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# धर्माबाद नगरपरिषद : स्थानिक नेतृत्वाचा ऐतिहासिक विजय



**धर्माबाद नगरपरिषद निवडणूक निकाल**

- मराठवाडा जनहित पक्षाचा ऐतिहासिक विजय
- नगराध्यक्ष पदासह १५ नगरसेवक निवडून
- भाजपला केवळ ७ जागांवर समाधान
- काँग्रेस, राष्ट्रवादी (दोन्ही गट), शिवसेना (दोन्ही गट), वंचित, सपा, एमआयएम – खातेही उघडता आले नाही
- धर्माबादच्या राजकारणात प्रथमच स्थानिक नेतृत्वाचा दबदबा

**भाजपची आघाडी कशी घसरली?**

- ४ भाजपचा अंदाज चुकला !
- निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच
- भाजपकडे उमेदवारीसाठी सर्वाधिक अर्ज
- सुरुवातीला भाजपच आघाडीवर असल्याचे संकेत
- मात्र उमेदवारी जाहीर होताच समीकरण बदलले
- स्थानिक नेतृत्वाच्या रणनीतीसमोर भाजप पिछाडीवर
- निवडणूक प्रचारात चित्र पूर्णतः पालटले

**आत्ताच एक्सपप्रेस**

**धर्माबाद प्रतिनिधी/ गंगाप्रसाद सोनकांबळे./** धर्माबाद नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत देशभरात प्रमुख पक्ष ठरलेल्या भारतीय जनता पार्टी आणि इतर राष्ट्रीय,प्रादेशिक पक्षावर धर्माबादचं स्थानिक नेतृत्व भलतंच भारी पडल्याचे दिसत आहे. नव्यानेच स्वबळावर निवडणुकीत उतरलेल्या मराठवाडा जनहित पक्षाने सर्वच राष्ट्रीय पक्ष,प्रमुख पुढाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहेत. नगराध्यक्ष पदासह १५ सदस्यपदांच्या जागेवर भरघोस मतांनी विजय मिळवत मराठवाडा जनहित पक्षाने एकहाती सत्ता मिळवली आहे.

धर्माबादच्या इतिहासात पहिल्यांदाच एका राष्ट्रीय पक्षांशिवाय स्थानिक नेतृत्वाला एवढा मोठा विजय मिळाला आहे. सौ.संगीताताई महेश बोल्लमवाड यांनी तब्बल ५ हजार एवढ्या मताधिक्क्याने नगराध्यक्षपदावर नाव कोरले आहे तर त्यांच्यासोबतच मराठवाडा जनहित पक्षाचे तब्बल १५ नगरसेवक निवडून आले आहेत. धर्माबाद नगर परिषदेअंतर्गत १ नगराध्यक्ष आणि ११ प्रभागांसाठी २२ नगरसेवक पदासाठी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. यामध्ये थेट नगराध्यक्ष पदासाठी खुल्या (महिला राखीव) प्रवर्गाला आरक्षण सोडत जाहीर झाली होती. २०१६ नंतर तब्बल नऊ वर्षांनी आज ही निवडणूक पार पडली आहे. कोरोना,नंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सतत ४ वर्षे लांबणीवर पडलेल्या निवडणुकांसाठी उमेदवारांसह जनता पण आतुर होती. प्रत्येक पक्षांनी सुद्धा आपापली रणनीती आखली होती. मात्र घडले ते आश्चर्यजनकच ! भारतीय जनता पक्ष आणि शंकर अण्णा उर्फ महेश बोल्लमवाड यांच्या माध्यमातून स्थानिक नेतृत्वातून उदयास आलेल्या मराठवाडा जनहित पक्ष या दोघांमध्ये या निवडणुकीची लढत दिसून येत होती. यामध्ये शंकरअण्णा बोल्लमवाड यांनी सूक्ष्म नियोजन आणि सर्व धर्मियांना विश्वासात घेत आपली प्रत्येक प्रभागात पकड मजबूत केली होती. सर्व धर्मियांसोबत निर्माण केलेला सलोखा त्यांना मताधिक्य गाठण्यास उपयुक्त ठरला. नगराध्यक्ष पदासह एकूण ११ प्रभागातील २२ सदस्यांपैकी १५ सदस्य मराठवाडा जनहित पक्षाचे निवडून आले आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात असलेल्या मराठवाडा जनहित पक्षाच्या वतीने पक्षाचे प्रमुख शंकर बोल्लमवाड यांच्या अर्धांगिनी सौ.संगीताताई महेश बोल्लमवाड यांचा तब्बल पाच हजार एवढ्या मताधिक्क्याने विजय झाला. तर भारतीय जनता पार्टीला केवळ सात जागांवर समाधान मानत दारुण पराभव पत्करावा लागला. उपरोक्त पक्षांसोबतच निवडणुकीत उतरलेल्या काँग्रेस,राष्ट्रवादी – अजित पवार गट, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना – ठाकरे आणि शिंदे गट,वंचित बहुजन आघाडी,समाजवादी पार्टी, एम आय एम यांना आपले खातेही उघडता आले नाही.

# पिशोर शफेपूर येथील अखंड हरीनाम सप्ताह सांगता



**महाप्रसादासाठी चार दिवस आधी प्रदूषणविरहित केळीची पाने कापून आणली गेली. परिसरातील अंदाजे २० ते २५ हजार भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. मागील वर्षीही अशाच प्रकारे प्रदूषणविरहित भंडारा झाला होते.** *छायाचित्र: सुनिल निकम*

**आत्ताच एक्सपप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी / सुनिल निकम./** कन्नड तालुक्यातील पिशोर गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला यंदा १५५ वर्षे पूर्ण झाली. रविवारी, २१ तारखेला मंडपात मोठ्या संख्येने भाविक जमले होते. गुरुवर्य माऊली महाराज अन्वेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, हा सप्ताह दादा महाराज अन्वेकर यांच्या कृपाशीर्वादाने सुरू झाला. आजवर गावकऱ्यांनी ही परंपरा जपली. शफेपूर हे भक्तांचा बालेकिल्ला असून, येथे मन रमते. पिशोर हे भक्ती सागराचे माहेरघर आहे.

माऊली महाराज म्हणाले, १९८५ साली सप्ताहाला १०० वर्षे पूर्ण झाली होती. त्या काळातील आठवणी आजही ताज्या आहेत. गावाने वारकरी संप्रदायाला अनेक रत्ने दिली. मोठ्यांचा आदर करणारी लेकरे असतील, तर बापानेही त्यांचे ऐकायला हवे, असे त्यांनी सांगितले. नंदबाबा आणि यशोदे मातेच्या भक्तीचा दाखला देत त्यांनी प्रेम, श्रद्धा आणि तपश्चर्येचे महत्त्व सांगितले.

कीर्तनाचे आयोजक राजू मोकासे यांनी गुरुमाऊली यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी मृदंगाचार्य मोरे महाराज, विनायकरी सोपान मोकासे, चोपदार बाजीराव सुरडकर, तुळशीदास तोडकर, गायनाचार्य एकनाथ महाराज शेलार, राजू महाराज मोकासे, भानुदास महाराज सुरडकर, ज्ञानेश्वर महाराज दवंगे, चंद्रभान नवले, गोविंद सुरडकर, रामदास महाराज मोकासे, नंदू सुरडकर, आकाश महाराज सोनवणे, गोकुळ सुरडकर, तुकाराम सुरडकर, वासुदेव राठोड, सोपान महाराज सुरडकर, ज्ञानेश्वर महाराज सुरडकर, तुकाराम महाराज सुरडकर, प्रदीप महाराज शेलार यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. महाप्रसादासाठी शफेपूरमधील सर्व समाजांनी दोन किलो हरभऱ्याच्या डाळीचे पुरणपोळी तयार केल्या. तीन ट्रॅक्टर भरून पुरणपोळ्या जमा झाल्या. बासुंदीसाठी ११०० क्विंटल दूध वापरले गेले.

आठ क्विंटल हरभऱ्याच्या डाळीचा सार बनवण्यात आला. प्रत्येक घरातून चार कुरडई व चार पापड जमा करून एक ट्रॅक्टर भरून पापड तयार करण्यात आले. भजेही बनवण्यात आले. पारावरच्या मुलांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली. गावकऱ्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# फुलंब्री नगरपंचायत महाविकास आघाडीच्या ताब्यात

## नगराध्यक्षपदी राजेंद्र ठोंबरे यांचा १,७९७ मतांनी दणदणीत विजय

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री । तालुका प्रतिनिधी/** फुलंब्री नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीने वर्चस्व सिद्ध करत नगरपंचायत आपल्या ताब्यात घेतली आहे. नगराध्यक्षपदासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजेंद्र ठोंबरे यांनी १,७९७ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. फुलंब्री नगरपंचायतीत एकूण १७,६३० मतदारांपैकी १४,८०३ मतदारांनी मतदान केले असून, ८३.९६ टक्के मतदान झाले.

मतमोजणीत राजेंद्र ठोंबरे यांना ८,१२४ मते, तर महायुती भाजपाचे उमेदवार सुहास शिरसाठ यांना ६,४१७ मते मिळाली. अपक्ष उमेदवार मतीन पटेल यांना ९३ मते पडली. निवडणूक अत्यंत अटीतटीची ठरली होती. मंगळवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी फुलंब्री तहसील कार्यालयात तहसीलदार व निवडणूक निर्णय अधिकारी योगिता खटावकर, मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे व निवडणूक अधिकाऱ्यांनी अधिकृत निकाल जाहीर केला.

निकाल जाहीर होताच महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयापासून शहरात डीजेच्या तालावर जल्लोष केला. विजयी नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे तसेच नवनिर्वाचित नगरसेवकांनी विजय मिरवणूक काढत जनतेचे आभार मानले. या विजयाचे श्रेय त्यांनी फुलंब्रीच्या जनतेला दिले. या जल्लोषात औरंगाबादचे माजी खासदार चंद्रकांत खैरे, अक्षय खेडकर, काँग्रेस तालुकाध्यक्ष संतोष मेटे, सुभाष पाटील, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख सोमनाथ पाटील करपे यांच्यासह अनेक नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते. शहरातील ज्येष्ठ नेते माजी सरपंच अशफाक पटेल, अजगर पटेल, महम्मद पटेल, मोबीन पाशा, फयाज पटेल, हरिदास घरमोडे, आकाश गंगावणे, जुबेर चिश्ती, पत्रकार सरफराज पटेल आदींची उपस्थिती होती.



### वार्डनिहाय निकाल

**वार्ड १**
काँग्रेस – खान अरसिया रिजवान : ३८७ (विजय)
भाजप – मीना ढोके : ३५६ (पराभव)
**वार्ड २ –** भाजप – द्वारका जाधव : ६६६ (विजय)
शिवसेना (ठाकरे) – पूजा घडामोडे : १३० (पराभव)
**वार्ड ३ –** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) – कुरैशी हलीमाबी मजीद : ३२९ (विजय)
भाजप – अश्विनी ढोके : १७४ (पराभव)
**वार्ड ४ –** काँग्रेस – जमीर पठाण : ३८० (विजय)
भाजप – रऊफ पटेल : १६७ (पराभव)
**वार्ड ५ –** काँग्रेस – हिना पटेल : ६६९ (विजय)
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) – बिस्मिल्लाह जफर : २५१ (पराभव)
**वार्ड ६ –** शिवसेना (उबाठा) – जावेद खान : ७२५ (विजय)
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) – योगेश सोनवणे : १९७ (पराभव)
**वार्ड ७ –** शिवसेना (उबाठा) – मसरत जफर चिश्ती : ४८ (विजय)
भाजप – मीराबाई काथार : ४०८ (पराभव)
**वार्ड ८ –** भाजप – योगेश मिसाळ : ८५७ (विजय)
शिवसेना (ठाकरे) – नरेंद्र सिमंत : १३४ (पराभव)
**वार्ड ९** – शिवसेना (ठाकरे) – सुषमेश प्रधान : ४५८ (विजय)
भाजप – सुमित प्रधान : ३२९ (पराभव)
**वार्ड १० –** भाजप – वाल्मीक जाधव : ४९६ (विजय)
शिवसेना (ठाकरे) – हरिदास घडामोडे : ४६२ (पराभव)
**वार्ड ११ –** शिवसेना (ठाकरे) – अर्चना दुतोंडे : ५२८ (विजय)
भाजप – आशा शिंगारे : २४० (पराभव)
**वार्ड १२ –** भाजप – गणेश राऊत : ६४९ (विजय)
शिवसेना (ठाकरे) – सांडू हापत : २६० (पराभव)
**वार्ड १३ –** शिवसेना (ठाकरे) – राणी घोडके : ४०२ (विजय)
भाजप – शारदा शेरकर : ३७७ (पराभव)
**वार्ड १४ –** भाजप – देविदास ढंगारे : ७०० (विजय)
शिवसेना (ठाकरे) – मनोज कुदळे : २०३ (पराभव)
**वार्ड १५ –** काँग्रेस – प्रशांत नागरे : ६६१ (विजय)
भाजप – गजानन नागरे : ३२२ (पराभव)
**वार्ड १६**
शिवसेना (ठाकरे) – सना शेख : ४२७ (विजय)
भाजप – लीलाबाई नागरे : २०८ (पराभव)
**वार्ड १७**
शिवसेना (ठाकरे) – शहा अन्नोबी जमील : **४६५ (विजय)
भाजप – सायमा कुरैशी : २१५ (पराभव)

# सत्तेची मस्ती व राजकीय द्वेषातून खोट्या प्रकरणात अडकवण्याचा आरोप

## खुनाच्या आरोपातील सामाजिक कार्यकर्ते व माजी ग्रामपंचायत सदस्य वामन साठे यांना सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण प्रतिनिधी / हारुन शेख /** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे वाढदिवसाचे बॅनर लावण्यावरून झालेल्या वादातून घडलेल्या मारहाणीच्या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. या घटनेप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या प्रकरणात बिडकीन येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य वामन रामराव साठे यांना राजकीय द्वेषातून व सत्तेच्या दबावाखाली आरोपी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. वामन साठे यांनी पैठण येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र तो अर्ज फेटाळण्यात आल्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता तसेच तक्रारदारांच्या वकिलांनी आपली बाजू मांडली. तर आरोपी वामन साठे यांच्यावतीने ड. सतेज जाधव व ड. अविनाश एस. बांगर यांनी युक्तिवाद करत, सदर घटनेशी साठे यांचा कोणताही संबंध नसून, ते घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नव्हते, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच राजकीय द्वेषातून व पोलीस यंत्रणेवर दबाव टाकून जाणीवपूर्वक त्यांना या प्रकरणात गोवण्यात आल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर मा. उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने सामाजिक कार्यकर्ते व माजी ग्रामपंचायत सदस्य वामन साठे यांना सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

# महायुती दोन वर्षात विजयाची हॅटट्रिक करणार?

## छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षीय बलाबल?

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** २०२५ महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. नगरपंचायत व नगरपरिषदेच्या निवडणुकांनंतर पालिकेच्या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे.महायुतीनेही रणनिती आखण्यास सुरु केली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये लोकसभा आणि विधानसभेनंतर महायुतीला आता महानगरपालिका जिंकून विजयाची हॅटट्रिक मारण्याची संधी आहे. छत्रपती संभाजीनगर हे आधीपासूनच शिवसेनेचा बालेकिल्ला होता. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने लोकसभा व विधानसभेत मोठा विजय मिळवला होता.

संभाजीनगर शहरात शिंदेसेनेचे दोन व भाजप-चे दोन आमदार आहेत. तसंच, शिवसेना आणि भाजपने एकएक कॅबिनेट मंत्रीपद शहराला दिले आहेत. तसंच, दोन खासदारही आहेत. महापालिका निवडणुकीत महायुती एकत्र लढण्याची चिन्हे आहेत. त्यामुळं महायुतीचे पारडे जड आहे. तर, दुसऱ्या बाजुला महाविकास आघाडीतील अनेक शिलेदार अगोदरच महायुतीतील कोणत्या ना कोणत्या पक्षात प्रवेश केला आहे.

दरम्यान, एप्रिल २०२०मध्येच छत्रपती संभाजीनगर महापालिकेची मुदत संपली होती व सभागृह विसर्जित करण्यात आलं होतं. तेव्हापासून या महापालिकेवर प्रशासक राज आहे. अस्तिककुमार पांडे हे पहिले प्रशासक होते. त्यानंतर डॉ. अभिजित चौधरी होते. तर आता जी. श्रीकांत यांच्याकडे अधिकार आहेत. तर, महापालिकेच्या १० वर्षांच्या हद्दीत ३ लाख ९८ हजार मतदार वाढले आहेत. त्यामुळं हे मतदार महापालिकेच्या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत.

**एकूण प्रभाग किती? २९**

**एकूण सदस्य संख्या? ११५**

११३ जागांपैकी ५८ महिलांसाठी, ३१ ओबीसी, २२ एससी आणि २ एसटीसाठी आरक्षित आहेत. त्यावरुन जागावाटपाचा वाद वाढू शकतो. गेल्या निवडणुकीत शिवसेना २९, एआयएमआय २५, भाजप २२ अशा जागा लढवल्या होत्या. तर या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुतीची स्पर्धा असेल.

**महापालिकेतील २०१४चे पक्षीय बलाबला**

शिवसेना-२८, भाजप-२२, एमआयएम-२५, काँग्रेस-११, राष्ट्रवादी काँग्रेस-०४, बसप-०३, अपक्ष-२२

**महापालिकेच्या निवडणुका कधी?**

राज्यातील सर्व २९ महापालिका निवडणुका या १५ जानेवारीला होणार असून निवडणुकांचे निकाल १६ जानेवारी रोजी लागणार आहेत. राज्यातील २८६९ जागांसाठी निवडणुक होणार आहे. १४४२ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. २७ नगरपालिकांची मुदत संपली होती. तर, जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन नगरपालिका अस्तित्वात आल्या आहेत.

# ६२४८ मतांनी केला शिवसेनेचे संजय बोरनारे यांचा पराभव



**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर प्रतिनिधी / सुयोग वाणी** वैजापूर नगर पालिकेच्या झालेल्या निवडणुकीत पुन्हा एकदा वैजापूरकरांनी आपला कौल भाजपला देत नगराध्यक्षपदाची माळ डॉ. दिनेश परदेशी यांच्या गळ्यात घातली. डॉ. परदेशी यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार संजय बोरणारे यांना तब्बल ६२४८ मतांनी धूळ चारत दणदणीत विजय मिळवून वैजापूर शहरावर आपले वर्चस्व असल्याचे पुन्हा सिद्ध केले. अटीतटीची लढत होईल असे अंदाज बांधले जात असताना डॉ. दिनेश परदेशी यांनी मात्र पहिल्या फेरीपासूनच आघाडी घेतली.परदेशींच्या नेतृत्वात भाजप राष्ट्रवादी युतीचे १५ नगरसेवक निवडून आले तर पालिका निवडणुकीतील विरोधी पक्ष असलेल्या शिवसेनेचे १० नगरसेवक वैजापूर शहरात निवडून आले आहेत.

### विजयी नगरसेवक

प्रभाग क्र. १
घाटे पारस अंबादास –विजयी शिवसेना शिंदे गट
बक्ष सोहेल सुमैया– विजयी राष्ट्रवादी.
प्रभाग क्र. २
मोनाली गणेश खैरे – विजयी भाजपा
विशाल जीवनलाल संचेती– विजयी भाजपा
प्रभाग क्र. ३
त्रिभुवन पूजा अविनाश – विजयी राष्ट्रवादी
शेख रियाज अकील गब्बु शेठ – विजयी राष्ट्रवादी
प्रभाग क्र. ४
जेजुरकर स्वप्नील विष्णु– विजयी शिवसेना
राजपूत संगीता राजूसिंग– विजयी भाजपा
प्रभाग क्र. ५
चौधरी जयश्री सावन – विजयी शिवसेना
साबेर खान अमजद खान– विजयी शिवसेना
प्रभाग क्र. ६
राजपूत दीपा विनोद – विजयी भाजपा
ताहेर साबेर खान (सुलतान खान) – विजयी शिवसेना
प्रभाग क्र. ७
त्रिभुवन राहुल कारभारी –विजयी शिवसेना
चव्हाण सविता शैलेश – विजयी भाजपा
प्रभाग क्र. ८
पुतळे बाबासाहेब सुखदेव – विजयी शिवसेना
वाणी लता लिमेश – विजयी भाजपा
प्रभाग क्र. ९
सैय्यद अमिर अली महेबूब अली – विजयी शिवसेना
घाटे सुरेखा सुरेश – विजयी शिवसेना
प्रभाग क्र. १०
जोशी ज्योती अनिल – विजयी भाजपा
कुरेशी शे. हमीद शे. हुसेन – विजयी शिवसेना
प्रभाग क्र. ११
बनकर दशरथ भगवान – विजयी भाजपा
सुवर्णा विजय (उल्हास) ठोंबरे – विजयी राष्ट्रवादी
प्रभाग क्र. १२
गायकवाड राजेश बळवंता – विजयी भाजपा
राजपूत जयश्री दिनेश – विजयी भाजपा
शिंदे कविता बाळासाहेब – विजयी भाजपा

# कन्नड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पदी काँग्रेसच्या फरीन शेख विजयी

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी / उदय कुलकर्णी/** दि. २१ डिसेंबर रोजी पार पडलेल्या कन्नड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पदाच्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या फरीन अब्दुल जावेद शेख यांनी ८५८ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच काँग्रेसच्या फरीन शेख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या उमेदवार व माजी नगराध्यक्षा सौ. स्वातीताई कोल्हे यांच्यावर सातत्याने आघाडी घेतली. अखेर शेवटच्या फेरीपर्यंत ही आघाडी कायम ठेवत त्यांनी कन्नड नगरपरिषदेचा गड सर केला.



या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) यांच्या आमदार सौ. संजनाताई जाधव यांच्या पक्षाच्या उमेदवार सौ. अनिताई कवडे तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. त्यामुळे हा निकाल आमदार जाधव यांच्यासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

या विजयामागे काँग्रेसचे माजी आमदार व पक्षाचे ज्येष्ठ नेते नामदेवराव पवार यांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची चर्चा आहे. निवडणुकीच्या पहिल्या दिवसापासून त्यांनी सर्व सूत्रे हातात घेत शहरातील तळागाळातील मतदारांशी थेट संपर्क साधला.

कार्यकुशल नियोजन व संघटनबळाच्या जोरावर हा विजय मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

दरम्यान, राज्यात युती असली तरी स्थानिक पातळीवरील बिघाडी, मतांचे विभाजन आणि विरोधकांचा अति आत्मविश्वास यामुळेच पराभव ओढवला, अशी चर्चा कन्नड नगरीत सर्वत्र ऐकायला मिळत आहे.

## नगराध्यक्षपदी काँग्रेसचे आमेर पटेल विजयी

# खुलताबाद नगरपरिषदेत काँग्रेसचा झेंडा कायम

## दोन्ही सत्ताधारी पक्षांना धक्का; नवख्या आमेर पटेल यांनी राखला काँग्रेसचा बालेकिल्ला

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी /** खुलताबाद नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासह १० प्रभागांतील सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार (दि. २ डिसेंबर) रोजी मतदान झाले होते. या निवडणुकीतील मतमोजणी रविवारी (दि. २१ डिसेंबर) रोजी नगरपरिषद सभागृहात पार पडली. ही प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ व सहाय्यक अधिकारी समीर शेख यांच्या उपस्थितीत पार पडली.

या निवडणुकीत खुलताबाद शहरातील मतदारांनी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आमेर पटेल यांना स्पष्ट कौल देत नगराध्यक्षपदी निवडून दिले. भाजपचे उमेदवार परसराम बारगळ व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार हाजी अकबर बेग यांचा पराभव झाला. नवख्या आमेर पटेल यांनी विजय मिळवत खुलताबादमध्ये काँग्रेसचा बालेकिल्ला कायम राखला आहे.




**प्रभागनिहाय निवडून आलेले उमेदवार**

**प्रभाग १**
अ: विजयी – मोहन देविदास तुपे (३९६) । पराभूत – बंडू माणिक सोनटक्के (२०१)
ब: विजयी – मीनाताई भाऊसाहेब बारगळ (३३७) । पराभूत – किरण अरुण तंबारे (३२८)

**प्रभाग २**
अ: विजयी – मीना भाऊसाहेब बारगळ (७८४) । पराभूत – पूजा उमेश लाळे (१९९)
ब: विजयी – नवनाथ विश्वनाथ बारगळ (६६०) । पराभूत – विष्णू कारभारी फुलारे (३२९)

**प्रभाग ३**
अ: विजयी – अर्चना सचिन पवार (५०३) । पराभूत – मनीषा बाळा अहिरे (३५७)
ब: विजयी – कैलास मट्टू बारगळ (४३५) । पराभूत – गोरख भिवसन बारगळ (३५३)

**प्रभाग ४** – अ: विजयी – शेख समरीन बानो अब्दुल आमेर (९०४) । पराभूत – रुक्साना बेगम कबीरोद्दीन (५९७)
ब: विजयी – शेख सलीमोद्दीन इफ्ताखोद्दीन (८६९) । पराभूत – अब्दुल अजीज करीम (५२९)

**प्रभाग ५**
अ: विजयी – शेख मुजीबोद्दीन मुनीबोद्दीन (५२३) । पराभूत – जहागीरदार मोहम्मद इम्रान (४९०)
ब: विजयी – गजाला परवीन मोहम्मद असलम (५८०) । पराभूत – नियाजोबी फकीर मोहम्मद कुरैशी (४५५)

**प्रभाग ६** – अ: विजयी – शेख अमीनाबी बुह्रानोद्दीन (५९८) । पराभूत – कुरैशी फरजाना बानो (४३५)
ब: विजयी – योगेश आसाराम फुलारे (४५३) । पराभूत – शेख जफर शेख बशीर (१६६)

**प्रभाग ७ –** अ: विजयी – कांताबाई सुरेश मरकड (४८८) । पराभूत – सईदा बेगम मोहम्मद जाफर (४११)
ब: विजयी – उमेश माधवराव आवारे (५३१) । पराभूत – सय्यद सैफ परवेझ (५२२)

**प्रभाग ८ –** अ: विजयी – शेख अजमत जहान वाजेउद्दीन (४८७) । पराभूत – सय्यद रुखसाना बेगम (३७५)
ब: विजयी – शेख तौसीफ शेख शरफोद्दीन (५४६) । पराभूत – सय्यद मकसूद अली (४६८)

**प्रभाग ९ –** अ: विजयी – मिर्झा अयाज बेग इक्बाल बेग (६२६) । पराभूत – शेख इक्रामुद्दीन अमिरोद्दीन (५३४) ब: विजयी – नशीम बानो मातोहर (६२०) । पराभूत – सय्यद रुक्साना शौकत अली (५३८)

**प्रभाग १० –** अ: विजयी – अनिता दिलीप बावस्कर (५०९) । पराभूत – सुगंधा देविदास ढवळे (४६२)
ब : विजयी – अनिस अहमद अब्दुल कादर (५८४) । पराभूत – खान सज्जाद अलीयार (३७३)

# अवघ्या २२व्या वर्षी स्नेहल धुपे पैठण नगरपरिषदेच्या नगरसेवकपदी विजयी

## अंबड तालुक्यातील वलखेडा येथील कन्येचा दणदणीत विजय; शिवसेना (उद्धव ठाकरे गट) उमेदवाराचा पराभव

**अवघ्या २२ वर्षांच्या तरुण वयात कुमारी स्नेहल सूर्यकांत धुपे यांनी पैठण नगरपरिषदेच्या नगरसेवकपदी दणदणीत विजय मिळवत एक नवा राजकीय इतिहास घडवला आहे. अंबड तालुक्यातील वलखेडा गावची कन्या नगरपरिषदेच्या सभागृहात पोहोचल्याने संपूर्ण अंबड तालुका व पैठण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना जिल्हा प्रतिनिधी/गणेश सपकाळ/** अंबड तालुक्यातील वलखेडा येथील मूळ रहिवासी व सध्या पैठण येथे वास्तव्यास असलेले मुख्याध्यापक सूर्यकांत धुपे यांची कन्या कुमारी स्नेहल सूर्यकांत धुपे यांनी पहिल्याच निवडणूक प्रयत्नात मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. विशेष बाब म्हणजे या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे उमेदवार पराभूत झाले असून, या निकालाने स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

पैठण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रथमच निवडणूक रिंगणात उतरलेल्या स्नेहल धुपे यांनी अत्यंत नियोजनबद्ध, मुद्देसूद व लोकाभिमुख प्रचार केला. त्यांनी तरुणाईचा उत्साह, महिलांचा विश्वास आणि विकासात्मक दृष्टिकोन यांचा प्रभावी संगम साधत मतदारांपर्यंत आपले विचार पोहोचवले. प्रचारादरम्यान त्यांनी स्वच्छता व्यवस्था, नियमित व दर्जेदार पाणीपुरवठा, खराब रस्त्यांची दुरुस्ती, ड्रेनेज व्यवस्था, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, युवकांसाठी रोजगार व कौशल्यविकासाच्या संधी तसेच नगरपरिषदेच्या मूलभूत नागरी सुविधांवर विशेष भर दिला.

घराघरांत जाऊन मतदारांशी थेट संवाद साधणे, नागरिकांच्या अडचणी ऐकून घेणे आणि त्यावर ठोस उपाययोजना सुचवणे ही त्यांची प्रचाराची खास शैली ठरली. त्यांच्या साध्या, अभ्यासू, संवेदनशील व लोकाभिमुख स्वभावामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले. स्नेहल धुपे या केवळ उमेदवार नाहीत, तर आमच्या समस्या समजून घेणारी आमची प्रतिनिधी आहेत, अशी भावना अनेक मतदारांनी व्यक्त केली.

या निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे गट) चे उमेदवारही जोरदार तयारीनिशी मैदानात उतरले होते. मात्र, जनतेच्या कौलात स्नेहल धुपे यांनी आघाडी घेतली आणि अखेर निर्णायक विजय मिळवला. या निकालामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सध्या पैठण नगरपरिषदेत अपेक्षित यश मिळवण्यात अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

कुमारी स्नेहल धुपे यांच्या या यशामागे त्यांचे कुटुंबीय, विशेषतः वडील मुख्याध्यापक सूर्यकांत धुपे यांची शैक्षणिक पार्श्वभूमी, सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग आणि मूल्याधिष्ठित संस्कार यांचा मोठा वाटा असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. शिक्षण, सामाजिक भान आणि जबाबदारीची जाणीव यांचे संस्कार स्नेहल यांच्या व्यक्तिमत्त्वात स्पष्टपणे दिसून येतात.

वलखेडा गावाची कन्या पैठण नगरपरिषदेच्या नगरसेवकपदी विराजमान झाल्याने अंबड तालुक्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे. निकाल जाहीर होताच पैठण व वलखेडा परिसरात समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी, गुलाल उधळत जल्लोष केला. अनेक सामाजिक, शैक्षणिक, युवक संघटना तसेच विविध राजकीय पक्षांच्या मान्यवरांनी स्नेहल धुपे यांचे अभिनंदन केले.

तरुण, सुशिक्षित, अभ्यासू आणि संवेदनशील नेतृत्व नगरपरिषदेला लाभले आहे. हे नेतृत्व शहराच्या विकासाला नवी दिशा देईल, अशी प्रतिक्रिया अनेक ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

निवडीनंतर आपली प्रतिक्रिया देताना कुमारी स्नेहल धुपे यांनी मतदारांचे मनापासून आभार मानले. त्या म्हणाल्या, पैठण शहरातील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे आणि पारदर्शकपणे काम करणार आहे. पाणी, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त योजना प्रभावीपणे राबवण्याचा माझा संकल्प आहे.

अवघ्या २२ वर्षांत मिळवलेला हा राजकीय विजय भविष्यातील नेतृत्वासाठी आशादायक मानला जात असून, स्नेहल धुपे यांची ही यशोगाथा अनेक तरुणींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



### 'महापारेषण' आणि 'महानिर्मिती'मध्ये

## ६५ के.व्ही. पारेषण प्रकल्पासाठी सामंजस्य करार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** राज्यातील वीज वहन यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमध्ये (महानिर्मिती) सामंजस्य करार झाला. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या प्रमुख उपस्थितीत सामजस्य करार पार पडला. ७६५ के.व्ही. क्षमतेच्या पारेषण प्रकल्पासाठी 'टॅरिफ बेस्ड कॉम्पिटिटिव्ह बिडिंग' (ढइउइ) अंतर्गत संयुक्तपणे निविदा सादर करण्याचा निर्णय दोन्ही वीज कंपन्यांनी घेतला आहे.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, मुख्य विधी सल्लागार विजय पाटील, मुख्य अभियंता (ढइउइ) अमित नाईक तसेच महानिर्मितीचे संचालक (वित्त) मनेश वाघिरकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुलकर्णी व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यामुळे महापारेषणचा पारेषण क्षेत्रातील अनुभव आणि महानिर्मितीची मोठ्या वीज प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील तांत्रिक कार्यक्षमता एकत्र येणार आहे. ७६५ के.व्ही. श्रेणीतील प्रकल्पांसाठी या दोन शासकीय कंपन्यांचे एकत्र येणे, राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

प्रकल्पाचे महत्त्व - **बळकट ग्रीड :** या नवीन प्रकल्पांमुळे वीजवहन क्षमता वाढून ग्रिड अधिक स्थिर होण्यास मदत होईल. **शासकीय कंपन्यांची स्पर्धात्मकता :** राज्यातील दोन प्रमुख शासकीय ऊर्जा कंपन्या एकत्र आल्याने प्रकल्प खर्चात बचत आणि गुणवत्तेत वाढ अपेक्षित आहे. **भविष्यातील गरज :** भविष्यातील वाढती विजेची मागणी लक्षात घेता ७६५ के.व्ही.ची यंत्रणा ही 'पॉवर कॉरिडॉर'साठी कणा ठरणार आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे महापारेषणचे देशातील अग्रगण्य राज्य पारेषण कंपनी म्हणून स्थान अधिक मजबूत होईल. महानिर्मितीसोबतच्या या समन्वयामुळे मोठ्या प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने आणि अधिक तांत्रिक सक्षमतेने करणे शक्य होणार आहे.

## सुखापूरी परिसरातील शेतकऱ्यांवर संकटांचा भिडीमार; बिबट्याची दहशत आणि रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे शेती अडचणीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/ गणेश सपकाळ/** अंबड तालुक्यातील सुखापूरी परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकरी भीतीच्या छायेखाली जीवन जगत आहेत. परिसरातील विविध ठिकाणी बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून, पाळीव जनावरांवर हल्ले करून शिकार केल्याच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.




या बिबट्याच्या वावरामुळे सुखापूरी मंडळातील कुक्कडगाव, रेवलगाव, लखमापुरी, वडीकाळ्या, बेलगाव, रुई, भारडी, दहेगाव खुर्द, करंजळा आदी गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. परिणामी अनेक शेतकरी शेतीच्या कामासाठी शेतात जाणे टाळत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

सध्या ऊस तोडणी, ऊस लागवड, गहू व हरभरा पेरणी, टरबूज पिकाला पाणी देणे, कापूस वेचणी, तूर काढणी व खुरपणी यांसारखी महत्त्वाची शेतीची कामे सुरू असतानाही बिबट्याच्या दहशतीमुळे ही कामे खोळंबली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, सुखापूरी मंडळ हे गहू, हरभरा व टरबूज यांसारख्या पिकांच्या विक्रमी उत्पादनासाठी जिल्ह्यात ओळखले जाते. मात्र, बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे आणि संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे येथील शेतकरी मानसिक तणावाखाली सापडले आहेत.

या संकटात भर घालणारी आणखी एक गंभीर समस्या म्हणजे एमएसईबी (महावितरण) कडून दिला जाणारा रात्रीचा वीजपुरवठा. सुखापूरी येथील उपकेंद्रामार्फत दिवसा वीज बंद ठेवून रात्री वीज दिली जात असल्याने शेतकऱ्यांना अंधारात शेतीची कामे करावी लागत आहेत. आधीच बिबट्याची दहशत असताना रात्री शेतात काम करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

याआधी झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे व अतिवृष्टीमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडले आहेत. पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असताना आता बिबट्याची दहशत आणि रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

या सर्व गंभीर बाबी असूनही वनविभाग, वीज वितरण कंपनी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी ठोस उपाययोजना करत नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. बिबट्याचा बंदोबस्त करणे, पिंजरे लावणे तसेच दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी शेतकरी सातत्याने करत असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

सध्या सुखापूरी परिसरातील शेतकऱ्यांवर संकटांचा अक्षरशः भिडीमार सुरू असून, *शेतकऱ्यांना पिळून पिळून मारले जात आहे* अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने, विशेषतः जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, रात्रीचा वीजपुरवठा बंद करून दिवसा वीज द्यावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे.

## वैद्य वडगाव प्रकरणी दोषींवर तात्काळ कारवाईची मागणी; वंचित बहुजन आघाडीचा सेवली पोलिस ठाण्यावर मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** मंठा तालुक्यातील वैद्य वडगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने अज्ञात समाजकंटकाने अनधिकृत ध्वज लावल्याची घटना घडली होती.



या प्रकरणाला १८ ते १९ दिवस उलटूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या निषेधार्थ व दोषींवर तात्काळ कारवाई करण्याच्या प्रमुख मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सेवली (ता. जालना) येथील पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष **दिपक डोके** यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला.

यावेळी जातीय तेढ निर्माण करणाऱ्या वैद्य वडगाव येथील अज्ञात समाजकंटकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन पोलिसांना सादर करण्यात आले.

मोर्चात **गौतम मगर, दिलीप मगर, बाबासाहेब मगर, संदीप मगर, माणिकराव मगर, दिलीप दत्तराव मगर, विश्वनाथ मगर, योगेश उघडे, रमेश उघडे, शरद मगर, कृष्णा मगर, प्रकाश सदर, बबन मगर, गुलाब मगर, अशोक मगर, गणेश खरात, दत्ता खाडे, मुकुंद काळे, एकनाथ दसारथ डोके, समाधान डोके, सम्यक डोके, मदन डोके, त्रिरत्न डोके, किरण डोके, रमेश डोके, मिलिंद डोके, अशीस मोरे, सुमेध मोरे, प्रल्हाद पालवे, शत्रुघ्न कोळी, प्रसाद सदावर्ते** यांच्यासह शेकडो महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फक्त भावच नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढवणार - सतीश घाटगे

### 'समृद्धी' च्या विभागीय कार्यालयाचे राणी उंचेगावमध्ये उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/ गणेश सपकाळ/** शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी भाव देण्याबरोबरच येणाऱ्या काळात समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे, समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी सांगितले.रविवारी राणी उंचेगाव येथे समृद्धी साखर कारखान्याच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन झाले.यावेळी परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी,भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतपानंद रस्त्याची सर्वात मोठी अडचण होती.समृद्धी कारखान्याने स्वखर्चातून दोनशे किमी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे रस्ते खुले करून दिले.शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात उच्चांकी भाव दिला.आता शेतकऱ्यांच्या समोर असेलल्या ऊस लागवडीचा, पत पुरवठा आणि खते आणि बियाणाचे प्रश्न सोडविण्यासाठी समृद्धी साखर प्रयत्न करणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देण्याबरोबर त्यांचे उत्पादनही वाढवणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी सुधारित जातीचे उसाचे बेणे , कंपोस्ट खताच्या पुरवठा करण्याबरोबर तज्ञामार्फत लागवडीचे योग्य मार्गदर्शन शेतकऱ्यांना करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी उसाचे पाचट न जाळता शेतातच कुजवण्याचे आवाहन केले.तसेच ऊस गाळपासाठी शेतकऱ्यांची स्पर्धा सुरु झाली आहे, उशिरा ऊस तुटल्यास नुकसान होईल, अशी भीती त्यांच्यात आहे.शेतकऱ्यांनी ऊस गाळपाची घाई करू नये.एकही शेतकऱ्यांचा ऊस गाळपाविना उभा राहणार नाही.असा शब्द सतीश घाटगे यांनी यावेळी दिला. समृद्धीच्या युनिट नंबर - २ चे काम प्रगतीपथावर असून लवकरच समृद्धी कारखान्याची गाळप क्षमता दुप्पटीने वाढणार आहे.हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त उसाचा प्रश्न कायमचा सुटेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813